| MHKO110009832016 | **नियमित दिवाणी दावा क्र. १६४/२०१६**<br>**आदेश निशाणी क्रमांक ९३**<br>**(श्री.सुरेंद्र धोंडीराम शिंदे वगैरे विरुध्द श्री.तुकाराम दादु गुरव )** |
|---|---|

वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ प्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे वारस यांचे असे कथन आहे की, वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचे दिनांक ०८.०४.२०२४ रोजी निधन झालेले आहे. त्यांच्या मृत्यूनंतर १. श्री.अशोक भिमराव शिंदे- मुलगा, २. श्री.संजय भिमराव शिंदे- मुलगा, ३. सौ.सुवर्णा सुनिल सावंत-मुलगी असे कायदेशीर व सरळ वारस आहेत. प्रस्तुतचा दावा हा दावा हा कायम मनाई मिळणेकरीता असल्याने वादी क्रमांक २ यांचे मृत्यूनंतर दावा चालविणेचा हक्क अबाधित राहतो. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी ९४ वर त्यांचे त्यांचे म्हणणे देऊन अर्जातील कथने चुकीची व खोटा असलेने व त्यामधील कारणेही योग्य व संयुक्तीक नसलेने वादींचा निशाणी ९३ चा अर्ज प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. सबब, निशाणी ९३ चा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताचा आदेश २२ नियम ३ अन्वये दाखल केलेला आहे. सदरहू नियमाप्रमाणे वादीच्या मृत्यूपश्चात दावा चालविणेचा अधिकार अबाधित रहात असेल तर त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेची तरतूद आहे. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द

कायम मनाई मिळणेसाठी केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता दावा हा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे वादी यांचे मृत्यूनंतरदेखिल दावा चालविणेचा अधिकार अबाधित राहतो. तसेच निशाणी ९०/१ वरील मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे हे दिनांक ०८.०४.२०२४ रोजी मयत झाले आहेत. वादी यांनी सदरचा अर्ज दिनांक २७.०९.२०२४ रोजी दाखल केला आहे. वादीतर्फे वारस यांनी शपथेवर अर्जात नमूद मयत वादी क्रमांक २ यांचे वारस असलेबाबत कथन केलेले आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाल होणेस मदत होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## - आ दे श -

**१.** अर्ज (निशाणी क्र.९३) मंजूर करण्यात येत आहे.
**२.** वादीतर्फे वारस यांनी अर्जात नमुद वादी यांचे वारसाबाबत १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.
**३.** अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करणेत येत आहे.

Sd/-
( श्रीमती एस.जे.पेंडे )
०२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पेठवडगांव

ठिकाण – पेठवडगांव
दिनांक - १३.१२.२०२४